ISSN–2278-5655

AMIERJ

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**

*Volume–XII, Issue– III* *May – June, 2023*

OPEN ACCESS

**Original Research Article**

# स्त्रीलिखित समाजकारण व राजकारण

*** डॉ. राजश्री पाटील,**

* पदव्युत्तर मराठी विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,

**कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी अभ्यासताना प्रिया तेंडुलकर यांची 'दिल्ली' ही कथा आठवते. वस्तुत: या दोन्ही साहित्यकृतींमधील राजकारण वेगळ्या स्तरांमधले आहे. राजकारण हा या दोहोंतील समान दुवा असला तरी, लेखनकाळ आणि भवताल पूर्णपणे भिन्न आहे. 'दिल्ली' तील राजकारण व चकचकीत वेष्टनामधले आणि 'ब्र' मधील राजकारण मात्र उघडेवाघडे. स्त्रीकडे स्वत:च्या मालकीची वस्तू म्हणून पाहणे दोन्हीकडे आहे. १९९२ च्या घटनादुरुस्तीनुसार स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली खरी; पण ही केवळ त्यांची उपस्थिती होती. निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे; थोडक्यात, स्त्रियांच्या मेंदूचा उपयोग होण्याची सुरुवात होण्यास अनेक वर्षे गेली.**

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

राजकारण आणि समाजकारण हे त्या – त्या काळानुसार बदलत असते. या दोहोंचा एकमेकांशी निकटचा संबंध असतो. कविता महाजन यांची 'भिन्न' ही कादंबरी तत्कालीन समाजकारणाचा दस्तऐवज आहे. या तिन्ही साहित्यकृतींचे एकमेकींशी असलेले नाते भाषिक आणि राजकीय – सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरते.

स्त्रियांचे सक्षमीकरण आणि लैंगिक समानतेचा केंद्रबिंदु व्यक्तीवाद हा आहे. स्वतंत्र व्यक्तिमत्त्व ही स्त्रीवादाची ठसठशीत खूण आहे. कविता महाजन यांच्या 'ब्र' आणि भिन्न या कादंब-यांचा अभ्यासाअंती हे जाणवते. सजगपणे जगाकडे पाहणा-या बहुश्रुत कार्यकर्तीचे लेखन आहे. अनुभवाधिष्ठित लेखनामुळे कलाकुसरीची धडपड येथे नाही आणि ती धडपड नसल्याकारणाने खरेपणा सहज येतो. 'ब्र' मधील प्रथमपुरुषी निवेदनातून उलगडत जाणारी एका कार्यकर्तीचे बदलणे दिसते. 'भिन्न' मधील अनेक एच्.आय.व्ही.

बाधित, एड्स्यग्रस्त स्त्रियांच्या कहाण्या निवेदनाच्या वेगळ्या पद्धतीमधून कथन केल्या जातात. स्त्रीवादी लेखनामधील निवेदनाची ही पद्धती वेगळी असली तरी ती प्रयोग नाही तर निर्मितीची गरज आहे. भयग्रस्ततेतून सुटका करुन घेऊन नवी वाट शोधणारी सर्जक वृत्ती या निवेदनशैलीच्या माध्यमातून समोर येते. '...सारं सारं जग मला आवडतं...' अशी सकारात्मकता या लेखनातून येते.

'व्यक्तीने निवडलेले कार्यक्षेत्र कोणतेही असले तरी त्या ठिकाणी प्रत्यही चालणारे राजकारण, आकारास येणारे नित्यनवीन हितसंबंध, त्यातील अनाकलनीयता, एकमेकांना शह-काटशह देण्यासाठी खेळले जाणारे डाव-प्रतिडाव आणि यातून घडत जाणारी आपली (कार्य!) संस्कृती 'ब्र' व 'भिन्न' मधून बारीकसारीक तपशीलांच्या सकट मूर्त होते, तेव्हा ते दर्शन सुस्थित वाचकांच्या गृहितकांना धक्का तर देतेच पण 'साहित्य', 'लालित्य' व 'सौंदर्य' आदि कल्पितांचे प्रचलित सांकेतिक आशय व रुपही उद्ध्वस्त करते. विशेषत: 'भिन्न' मधून उलगडत जाणारे अनुभवविश्व समजावून घेत असताना असे वाटते की टाटा समाज विज्ञान संस्थेत प्रकल्प संशोधन अधिकारी म्हणून काम करत असताना जे काही संचित लिखित व मौखिक रुपात लेखिकेने गोळा केले त्याआधी आणि त्यानंतर जे काही अनुभवले त्यातून हे अजब रसायन तयार झाले आहे. ते अंतर्यामी इतके उसळते आहे की त्याला आता बाहेर वाट फोडल्याशिवाय गत्यंतर नाही. ही ऊर्मी अनावर झाल्यानेच बहुदा कथानकाच्या कक्षेत जे बसत नाही ते कलात्मकतेची जराही फिकीर न करता लेखिकेने अहवाल, बातमी, सविस्तर वृत्तांन्त या स्वरुपात समारोपादाखल कादंबरीत समाविष्ट केले आहे. एका अर्थाने अतिवास्तवतावादापासून, अस्तित्ववादापासून वास्तववादापर्यंत नेणारा हा जाणिवेचा प्रवास उलट दिशेने लेखिकांच्या कादंब-यांमधून घडतो.' 'ब्र' आणि 'भिन्न' मधील अनुभवविश्व हे असे आहे.

स्त्रियांना देऊ केलेल्या आरक्षणामुळे राजकीय परिस्थिती बदलली असा देखावा निर्माण झाला. या दिखाऊ राजकीय बदलाचे सामाजिक परिणाम 'ब्र' मधून लेखिकेने चितारले आहेत. समाजाचा अर्धा आणि महत्त्वाचा हिस्सा यामुळे 'ब्र' उच्चारु लागला. बाईला स्वत:चा विचार असू नये अशी धारणा असणारा अर्धा हिस्सा बैचेन झाला. या बैचेनीतून वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा देण्याची

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– III May – June, 2023
OPEN ACCESS Original Research Article

कृत्ये होऊ लागली.

स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अशा 'ब्र' उच्चारणा-या आणि शब्द गिळणा-या बायांचे अनुभव ऐकून, त्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास करुन, त्यांच्या चालीरितींचे संदर्भ तपासून, वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन तसेच स्त्रीसक्षमीकरणाचे सर्व मार्ग शोधण्याचा जो प्रयत्न केला गेला या मार्गांचा दस्तावेज 'ब्र' मध्ये येतो. भगिनीभावातून आलेली सकारात्मकता हा या लेखनाचा गाभा आहे. कडूबाई, शेवळीबाई, चान्नी, रानूबाई ही भगिनीभावाची उत्तम उदाहरणे आहेत. उपसरपंचाकडे आश्रित असणारी कडूबाई सरपंच होते तर तहसिलदार बाईंना बघून चान्नीची राजकीय महत्त्वकांक्षा जागी होते. या सगळ्या स्त्रियांची समष्टीचा विचार करणारी दृष्टी महत्त्वाची वाटते.

जयाबाईसारख्या स्त्रीला सत्तेचे नव्हे तर स्त्री-पुरुष संबंधामधील राजकारण इतके महागात पडले की, तिचा नवरा तिचा हात कु-हाडीने तोडतो. कारण, भगताने तिला भुताली ठरवलेले असते. 'ब्र' उच्चारणा-या सर्व स्त्रीयांची हीच दशा होणार हे जणू अधोरेखितच होते.

आदिवासी पाड्यांमध्ये, ग्रामीण भागामध्ये दबलेल्या, मार खाणा-या या भयग्रस्त स्त्रिया प्रफुल्ला पाहते.जिंकणा-या इतर स्त्रियांना भयमुक्त करणा-या, मार्ग काढणा-या स्त्रियाही ती पाहते. वैयक्तिक आयुष्यात स्त्री म्हणून सर्व नात्यांमध्ये होरपळून निघालेली प्रफुल्ला असेच भयग्रस्त आयुष्य जगत असते. तिच्यात नसलेले दोष, तिने न केलेल्या चुका पुन्हा पुन्हा तिच्यासमोर उगाळून तू कशी नालायक आहेस हे दाखवून दिले गेलेले असते. हे एकटेपण, तिला विपरीत परिस्थीतीत काम करण्याची ऊर्जा देते. द-या – डोंगरांचा, अवघड पायवाटांची भौगोलिक परिस्थिती तिच्या आयुष्यातील खाचखळग्यांशी समांतर आहे. निरसलपणे समाजसेवा करणारे डॉ.दयाळ, डॉ. एंजला या कादंबरीत आहेत. पत्नी, मैत्रिणी, संघटनेमधील सहकारी अशा सर्व नात्यांमध्ये स्त्रियांचा 'उपयोग' करुन घेणारा सुमेध या कादंबरीत आहे. प्रफुल्लाला, पाड्यावरील आणि ग्रामीण स्त्री तसेच नागरी भागातील स्त्रीयांचे समांतर पातळीवरील 'स्थान' तो दर्शवतो.

आदिवासींशी समरस होणारी, त्या स्त्रीयांमध्ये स्वत:चे प्रतिबिंब पाहणारी, त्यांची भाषा बोलणारी, जिवाभावाची मैत्रीण रेवती हिच्या ऋणात राहणारी, घरच्या मदतनीस मावशींचा आदर

करणारी प्रफुल्ला, सेवूबाईला दारु गाळण्याच्या व्यवसायापासून परावृत्त करणारी, स्वत:च्या मुलालाही त्याच्या (स्वार्थापुरता आईसोबत राहण्याच्या) निर्णयावर सुनावते. कादंबरीच्या सुरुवातीला उद्धृत केलेल्या भिंगरुटीएचा दृष्टांत जे सांगतो तेच स्त्रीसबलीकरण आहे हे या घटनाक्रमामुळे ध्यानात येते.

'कविता महाजन यांच्या 'ब्र' मधून आपल्याला आतापर्यंत अपरिचित असलेले दुर्गम भागातले आदिवासी वाड्या-वस्त्या-पाड्यातले जग, 'भिन्न' मधून नकोशी वाटणारी, अस्पर्श राहिलेली एच.आय.व्ही. ग्रस्त – बाधितांची दुनिया आणि या दोन्ही कादंब-यांतून गेल्या १०/१५ वर्षात फोफावलेल्या स्वयंसेवी संघटनांचा कारभार, त्यांचे अर्थकारण व राजकारण समोर येते, तेव्हा ते वाचताना देखील आपण थकून जातो. इतके ते आजवर दृष्टिआडच केलेले , अनुल्लेखाने मारले होते आणि त्या जगातले स्त्री-पुरुष बहिष्कृत, दु:ख मूकपणे स्वीकारणारे, सहन करणारे होते. ज्यांना ब्र उच्चारता आला त्या सर्व जिभांना 'ब्र' ही कादंबरी अर्पण केली आहे, हे अर्थपूर्ण व सूचक आहे.' डॉ. रेखा इनामदार यांचे हे मत, या दोन्ही कादंब-यांचा आशयानुसार बदललेला घाट दर्शविते.

जन्म आणि मृत्यू यांमधील यातायात, तिचा शोध, तिचा सुत्र करणारा परिणाम म्हणजे 'भिन्न'. लोकलसाठी धावण्यापासून सुरु होणारी बाईची धडपड, मृत्यूचं सोबत असणं आणि अनंत वेदना सहन करीत मृत्यूच्या स्वाधीन होणं हे 'भिन्न' चे कथासूत्र. माणसांनी माणसांना वेगवेगळ्या कारणांनी वेगळं-वेगळं करणं, जात - धर्म - रंग, लिंग, पैसा अगदी निरोगी आणि विशिष्ट रोगांनी पीडित असाही भेद, शकलित बुद्धीच्या माणसांपेक्षा आम्ही सर्वार्थाने भिन्न असतो असे ठामपणे, कृतीतून सांगणा-या प्रतीक्षा, रचिता आणि लेनिना या तीन स्त्रीया म्हणजे या कादंबरीचे प्राणतत्त्व आहेत.

व्यक्तिगत आयुष्यामध्ये मुले आणि मैत्रिणी वगळता जगूच नये अशी परिस्थिती असून, एड्सग्रस्त असून मार्ग शोधणारी रचिता ही नव्या स्त्रीवादाचा चेहरा आहे. निर्णयक्षम कार्यकर्ती असणारी प्रतीक्षा खाजगी आयुष्यात चुकीचे निर्णय घेते. भयग्रस्ततेतून मुक्तता म्हणजे आत्महत्या हा प्रतिक्षाचा 'विचार' आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– III May – June, 2023

OPEN ACCESS Original Research Article

''... आपण आपल्या वस्तुंशी चांगलं वागलं पाहिजे. आपण आपल्या बाजूनी चांगलं वागूनही हाड् हुड् करणा-या माणसांसारख्या हलकट नसतात त्या...'', ''दगडाला जळू लावून काही उपयोग आहे का? ''अशा वाक्यांमधून, प्रश्नांमधून पुढे जाणारे कथानक.....'' तुम्ही अंगावर कपडे घालणार, विचारांना कपडे घालणार, भावनांना कपडे घालणार, कधी तरी मोकळ्या व्हा न जान कुठेतरी....''. असे संवाद जगण्यातील दांभिकतेला खुले आव्हान देताना, 'भिन्न' ची लेखनशैली या कादंबरीला दस्तऐवजाचे रुप देते, सारधोपट लेखन हे या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. येथे उद्धृत केलेले संवाद दुहेरी अवतरणात लिहिले आहेत. परंतु, कादंबरीत मात्र लेखिकेने एकूणच अवतरणचिन्हांचा वापर केलेला नाही. प्रश्न आणि उद्गारवाचक चिन्हे यांचा उपयोग लेखिकेने केला आहे. निर्मात्या म्हणून कविता महाजन यांची यामागे कोणती भूमिका असावी असा प्रश्न पडतो. केवळ प्रश्न आणि प्रश्न असे असावे की भवतालची भयचकित करणारी अमानुषता! 'ब्र' उच्चारणा-या कृतीशील स्त्रियांचे प्रश्न आणि मार्ग काढण्याच्या त-हांमध्ये वाचकांना वाङ्मयीन मूल्ये सापडतात. 'भिन्न' मधील दस्तऐवजी करणाचे रुप मात्र असे नाही.

'ब्र' चा भाषिक अंगानी विचार करता असे लक्षात येते की, या निवेदनामध्ये चित्रमयता आहे. 'ब्र' चे वाङ्मयीन मूल्य उच्च दर्जाचे आहे. भिन्न मधील कथन हे तटस्थपणे, एका कार्यकर्तीने केलेले आहे. दस्तऐवजाचा थेटपणा त्यात असला तरी कोरडेपणा त्यात नाही. या कथनातूनच वाचकाच्या लक्षात येते की, नवरा आणि भावाला एकाच तराजूत तोलण्याची शहाणीव या स्त्रीवादामध्ये आहे. काळं खळं, गळाठा, जुळी मैत्रीण असे बोलीतील शब्द या कादंबरीत येतात. 'क्च' हा उच्चार दैनंदिन जीवनात नेहमीच असला तरी कादंबरी मध्ये तो शब्दबद्ध झालाय ही गोष्ट कादंबरीतील घटनाक्रमाशी वाचकांचे नाते जोडणारी आहे. या घटना मन व्यथित करणा-या आहेत.

'ज्यांना ब्र उच्चारता आला त्या सर्व स्त्रियांना' अशी 'ब्र' ची अर्पण पत्रिका आहे. स्त्रिमुक्ती नव्हे तर स्त्री स्वातंत्र्याप्रत वाटचाल करणा-या सर्व स्त्रियांनाही कादंबरी अर्पण केलेली आहे. मुक्ती ही अभाव रुप संकल्पना आहे. स्वातंत्र्य ही मात्र सकारात्मक

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– III May – June, 2023
OPEN ACCESS Original Research Article

संकल्पना आहे. जबाबदारीची जाणीवही स्वातंत्र्यातील महत्त्वाची घटना आहे.

''ब्र' या कादंबरीच्या एकाच वर्षी (२००६) तीन लोकआवृत्या प्रकाशित झालेल्या दिसतात. याचा एक अर्थ असा होतो की, साहित्याचे अभ्यासक, समीक्षक व विद्यार्थी यांचे ठराविक वर्तुळ भेदून सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचण्यात या लेखिका यशस्वी ठरल्या'.

स्त्री लिखित राजकीय लेखन या दृष्टिकोनातून 'ब्र' चा विचार करता, प्रिया तेंडुलकर यांच्या 'दिल्ली' या कथेतील चकचकीत राजकारण आपसूक आठवते. 'तिहार' हा कथासंग्रह अलीकडे प्रसिद्ध झाला असला तरी, लेखनकाळ आधीचा आहे. सुहासिनी ही या प्रस्थापित खासदार स्त्रीची ही कथा आहे. खासदार मंत्र्यांचे बंगले, बागा, लाल दिव्याच्या मोटारी, शास्त्रीभवन सारख्या स्वत:चे व्यक्तिमत्त्वाचे असलेल्या इमारती अशा घटकांमुळेही कथा राजकीय कथा होते असे नाही. वेगवान घटनाक्रम, दिल्लीचे चकचकीत राजकारण, संधीसाधू राजकारणी पेचप्रसंग, निवेदन यांमुळेही कथा श्रेष्ठ दर्जाची राजकीय कथा ठरली आहे.

१९९२ सालच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर स्त्रियांना ३३% आरक्षण मिळाले, या आरक्षणामुळे स्त्रियांचा राजकारणात मोठ्या प्रमाणात प्रवेश झाला.केंद्रीय पातळीवर यशस्वी झालेल्या स्त्रिया खूप कमी प्रमाणात होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मात्र मोठ्या प्रमाणात संख्यात्मक बदल झाला. दिल्ली ही कथा १९९१ सालच्या सार्वजनिक निवडणूकी पूर्वी अल्पजीवी ठरलेल्या शासनाचे संदर्भ घेवून साकर होते. बुद्धिमान, महत्त्वकांक्षी. सुंदर आणि राजकारणाची कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेली सुहासिनी मानसिंग ही या कथेची नायिका आहे. या कथेची भाषाशैली वेगवेगळी राजकीय, सामाजिक सता उकलून दाखविण्यात यशस्वी ठरली आहे. या सत्तेच्या माध्यमातून राजकारणातच नव्हे तर दैनंदिन जीवनात स्त्रियांच्या शोषणा संदर्भातील सत्य वाचकाच्या समोर येऊ लागते. ''नाही अगं मनापासून सांगतोय उगाच नाही तुझा पक्ष जोरदार आपटला तरी तुला पेट्या भरून मत मिळतात! असा चेहरा आमचा असता तर आम्हीही...'' या बापुसाहेबांच्या बोलण्यातून अनेक राजकीय डावपेच आणि त्या डावपेचांना बळी पडणारी स्त्री दिसते. दुर्दैवाने राजकारणातील स्त्रीचं चारित्र्यहनन ही इतरांच्या दृष्टीने सर्वात सोप्पी गोष्ट असते!

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– III May – June, 2023
OPEN ACCESS Original Research Article

पक्षाने तिच्या बाह्य व्यक्तिमत्त्वाच्या चेह-याचा उपयोग करुन घेणे हे शोषणच झाले. स्त्रिया संस्कृतीच्या वाहक असतात असे त्यांच उदप्तीकरण करण पक्ष हितासाठी केले जाते. आपल्याला पक्षाच्या विचारसरणीचा जणू ब्रँड असतात त्या. या ब्रँडनुसार त्यांची देहबोलीच काय; तर प्रवेश वेशभूषेतील रंगसंगती सुद्धा बदलते, किंवा बदलवली जाते. ''अर्जुन म्हणे आबांकडे मी यायचो तेव्हा अर्जुनच म्हणायचीस. हा बापुसाहेबांचा आग्रह राजकारणात मुरलेल्या सुहासिनीला चकित करतो. जिच्या वडिलांनी बापूसाहेबांना मोठे केले त्या चाणाक्ष, हजरजबाबी सुहासिनीकडे कित्येक वर्षांनंतर झालेल्या भेटीतही बापूसाहेब अभिलाषेने बघतात. मला 'अर्जुन' असे एकेरी संबोधतेस तेव्हा बघायला आहे कोण इथे तिसरं?'' असा स्पष्ट सवाल करतात. प्रिया तेंडुलकर यांच्यामधील बहुश्रुत लेखिका राजकारणी पुरुषाचा लाळघोटेपणा अधोरेखित करतात. धर्मपत्नी उपयोगासाठी आणि इतर स्त्रिया उपभोगासाठी हे राजकारणी पुरुषाचे 'तत्त्व' या निवेदनातून स्पष्ट दिसते.

''पैसा आवडणं ही चूक आहे?'' असा प्रश्न विचारणारी सुहासिनी समाजवादी पक्षाची तत्त्वं मिरविणा-या बापुसाहेबांना कुणीतरी इम्पोर्टेड छत्री दिली असता त्यांना झालेल्या आनंदाची आठवण करुन देते. अवघ्या पाच महिन्यांच्या गृहमंत्रीपदाच्या कारकिर्दीत बापुसाहेबांवर झालेल्या आरोपांचा पाढा त्यांच्या पुढ्यात वाचते. सकाळी मुलाखत घ्यायला आलेल्या चिमुरड्या पत्रकारणीला, राजकारणी स्त्रीला शोभतील अशी गोल गोल उत्तरे देते''. इट इज कन्विनियंट टू बी मॅरीड'' असे सांगते. मर्चंट चेंबर्सच्या कार्यक्रमामध्ये बाप, नवरा किंवा भााऊ यांच्या प्रभावातून बाहेर न पडणा-या स्त्रियांकडे पाहून मनात हसते. हीच सुहासिनी कौटुंबिक राजकारणामध्ये शोषिताच्या भूमिकेमध्ये आहे बडा व्यावसायिक असलेल्या मुजोर नव-याच्या फोनवरील बोलण्याचा त्याला अपेक्षित असलेला परिणाम होतो कारण, सुहासिनी निर्णायक क्षणी बापूसाहेबांना शरण जाते.

एका दिवसातील घडामोडींवर आधारित अशा या कथेमध्ये सुरुवातील तो-यात असणारी सुहासिनी त्याच दिवशी रात्री हारतेही आणि जिंकतेही. नव-याच्या दुष्कृत्यांमध्ये सहभागी असलेला मुलगा आणि नव-याच्या चुकांवर पांघरुण घालणारी सुहासिनी, स्वत:चे करिअर वाचविण्यासाठी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– III May – June, 2023

OPEN ACCESS Original Research Article

बापुसाहेबांची सुप्त इच्छा पूर्ण करते.

'दिल्ली' मध्ये उच्चभ्रू, चकचकीत वातावरणामधील घुसमट दिसते तर 'ब्र' मध्ये आव्हान पेलणा-या, तेहतीस टक्के आरक्षणामुळे सत्तेची चव चाखणा-या स्त्रिया दिसतात. त्या आव्हाने पेलताना किंवा शिक्षा भोगताना दिसतात परंतु इथे घुसमट नाही. नव्याने आरक्षण मिळाले तेव्हा घरातल्या पुरुषांनी निर्णय घेतले खरे; सत्ताधीश तेच होते. परंतु, कालांतराने बदल होत गेले आणि स्थानिक स्वराज्य संस्था चालविणा-या अनेक स्त्रिया 'स्वतंत्र' झाल्या. त्यांचा प्रवास, थेट स्त्री स्वातंत्र्याकडे झाला यात शंका नाही.

संदर्भ:

१) डॉ. रेखा इनामदार साने 'आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा' पृष्ठ १४ स्त्रीलिखित मराठी कादंबरी (१९५०-२०१०) संपादन : अरुणा ढेरे

२) डॉ. रेखा इनामदार साने 'आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा' पृष्ठ २५ स्त्रीलिखित मराठी कादंबरी (१९५०-२०१०) संपादन : अरुणा ढेरे

*Cite This Article:*

* डॉ. पाटील र . *(2023)*. स्त्रीलिखित समाजकारण व राजकारण, *Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XII (III) May-June, 106-113.*